0 5 JUL 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उन्हाळी सत्रातील परीक्षा १० ऑगस्टपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील (मार्च-एप्रिल २०२१) मधील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. १० ऑगस्ट ते १५ सप्टेंबरदरम्यान होणार आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार या परीक्षांचा कालावधी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे.

पदवी पातळीवरील कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रथम आणि द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थेच्या स्तरावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. ही परीक्षा ५० गुणांसाठी घेण्यात येणार असून त्यासाठी २५ बहुपर्यायी प्रश्नांचा पेपर असणार आहे. तो सोडविण्यासाठी एक तासाचा वेळ असणार आहे. या औषधनिर्माण, विधि, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र,अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांच्या पदवी, पदव्युत्तर परीक्षा समन्वयक महाविद्यालयांकडून घेण्यात येणार आहेत. पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि एम. फिल., प्रि-पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा या ऑनलाईनने महाविद्यालय आणि अधिविभागांच्या पातळीवर घेतल्या जातील, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JUL 2021
पुढारी

# ऑनलाईन संगणक प्रणालीचा आजपासून प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रकासाठीच्या ऑनलाईन संगणक प्रणालीचा प्रारंभ सोमवारी (दि. ५) दुपारी ३ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रक घेण्यासाठी शुल्क भरावे लागते. सध्या प्रत्यक्ष येऊन अर्ज करावा लागत असल्याने विद्यार्थ्यांचा वेळ आणि खर्च वाया जात आहे. विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन विद्यापीठाने स्वनिर्मित ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित केली आहे. लिंकचा वापर विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी करावा, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 5 JUL 2021
सकाळ

# उन्हाळी सत्रातील परीक्षा ऑगस्टमध्ये ऑनलाईन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन परीक्षांना दहा ऑगस्टपासून सुरवात होत आहे. त्याबाबतचे पत्रक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

पदवीस्तरावरील अभ्यासक्रमांच्या प्रथम व द्वितीय सत्रातील परीक्षा ऑनलाईन पद्धतीने १० ऑगस्ट ते १५ सप्टेंबर दरम्यान होणार आहेत. परीक्षेकरिता एक तासाचा कालावधी असून २५ प्रश्न विचारण्यात येणार आहेत. त्याचबरोबर डिप्लोमा, पदव्युत्तर व सर्टिफिकेट कोर्सच्या परीक्षा १० ते ३० ऑगस्ट दरम्यान घेतल्या जाणार आहेत. औषधनिर्माणशास्त्र, विधी, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा १० ऑगस्ट किंवा तत्पूर्वी सुरू होणार असून, त्या १० सप्टेंबरपर्यंत होतील. एम. फिल. व प्री पीएच. डी. कोर्स वर्कशॉप परीक्षाही १० ऑगस्टपासून सुरू होणार आहे. महाविद्यालय व विभागस्तरावर त्यांचे नियोजन केले जाणार आहे. ही परीक्षा ऑनलाईन डिस्क्रिप्टिव्ह पद्धतीने होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JUL 2021
तरूण भारत

# रोजगार निर्मितीसाठी तांत्रिक, संवाद कौशल्याची गरज

कोल्हापूर : कन्स्ट्रक्शन कंपनीचे विविध विभाग असतात अशा मल्टिनॅशनल कंपनीत रुजू होण्यासाठी तांत्रिक कौशल्य आणि संवाद कौशल्याची गरज असते, असे मत इंजिनिअर शुभम लेवारकर यांनी व्यक्त केले. तंत्रज्ञान विभागाअंतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत 'करियर अपॉर्च्युनिटी इन सिव्हील इंजिनिअरिंग' या विषयावर आयोजित वेबिनारमध्ये ते बोलत होते. मान्यवरांनी युपीएससी, एमपीएससी, रिसर्च याव्यतिरिक्त खासगी क्षेत्रातील विविध संधींविषयी मार्गदर्शन केले.